# चला साजरी करुया खरी शिवजयंती

काय आश्चर्य आहे... महापुरुषांच्या जन्म दिवसाला जयंती असे म्हणतात. परंतु परम पुरुषाच्या जन्म दिवसाला ''शिवरात्री''? मनुष्याच्या जन्म तर रात्री होवो अथवा दिवसा त्याला जन्म दिवसच म्हटले जाते. परंतु भगवानाच्या दिव्य जन्माला मात्र ''शिवरात्री'' म्हटले जाते.

फाल्गुन महिण्याच्या चौदाव्या रात्रीला महाशिवरात्रीचा उत्सव साजरा केला जातो. हीच रात्र त्यासाङ्गी का निवडली गेली आहे. भक्त लोक व्रत धारण करतात. रात्री जागरण करतात, दिवसभर मंदिरामध्ये शिवाची पूजा-अर्चना केली जाते आणि शिवाच्या गीतांनी आकाश दुम-दुमून जाते. कोणते सत्य रहस्य आहे या उत्सवाच्या मागे...

**शिव कोण आहे, त्याच्याशी आमचे कोणते सम्बंध आहेत..?**

शिव परम आत्मा आहेत, ते परम सत्ता आहेत. ते सृष्टीचे बिजरुप सत चित् आनंद स्वरुप आहेत आणि आम्हा सर्वांचे परमपिता आहेत. त्यांच्याशी आमचे पिता-पुत्राचे नाते अनादी अविनाशी आहे. आम्ही त्यांची आङ्गवण करतो कारण की ते आमचे आहेत. त्यांच्यात आणि आमच्यात निर्माण होणाऱ्या प्रेमाचे कारण सुध्दा हेच आहे.

**परमात्मा खरोखरच येतात का ?**

ते आमचे परमपिता आहेत, पिता आणि पुत्राचे भेट होणार नाही असे होतच नाही. त्यांच्या भेटीने परम सुख, असीम शांति व अतिनिंद्रीय परम आनंदाची अनुभूती होते म्हणून मनुष्य त्यांना भेटण्याची इच्छा बाळगतात. भारता मध्ये परमात्मा येण्याची अनेक स्मृती चिन्हें आहेत... त्यापैकीच प्रमुख म्हणजे - ''महाशिवरात्री'' चा उत्सव. श्रीमद् भगवतंगीता त्याचे प्रत्यक्ष प्रमाण आहे. शिवाची मंदिरे त्याचे प्रत्यक्ष ज्वलंत उदाहरण आहे. अन्य धर्मामध्ये व देशांच्यामध्ये हे सर्व नाही. हे सत्य आहे की शिव भगवान भारतात येतात. भारत ईश्वराची जन्म भूमी व कर्म भूमी आहे. समजा ते कधी आले नसते तर आम्ही त्यांना बोलावले हि नसते.

**शिव परमात्मा का येतात ...?**

भारताला पुन्हा स्वर्ग बनविण्यासाङ्गी शिव भगवान येतात. आपल्या भक्तांची मनोकामना पूर्ण करण्यासाङ्गी भगवान येतात. ते पतितांना पावन करण्यासाङ्गी येतात. ते विश्वातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाङ्गी येतात. फाल्गुन महिना हा शेवटचा महिना असतो, त्याच्या कृष्ण पक्षातील चौदावी रात्र ही गहन अंधःकाराने भरलेली असते. याच दिवशी शिवरात्री साजरी करण्याचे तात्पर्य हेच आहे की जेव्हा कलियुगाचा अंत होत असतो, त्या आगोदर काही काळ भगवान येत असतात. कलियुगाचा अंत करुन नवीन सतयुगाची स्थापना करतात.

**शिव कसे येतात ...?**

बैलावर बसून येतात ? बैल तर तसा हळू चालणारा प्राणी आहे शिवाचे वाहन नंदीगणच दर्शविण्यात आले आहे. याचाच अर्थ असा आहे की निराकार परमात्मा ब्रम्हाच्या शरीरामध्ये प्रवेश करतात. ब्रम्हाचेच दूसरे नाव नंदीगण आहे. ज्या प्रमाणे गाय माता आहे, त्याच प्रमाणे नंदीगण ब्रम्हा प्रजेचे पिता प्रजापिता आहेत. निराकाराला साकार शरीराची आवश्यकता आहे, आपले दिव्य कर्म करण्यासाङ्गी ते प्रजापिता ब्रम्हाचे शरीर घेतात. शिव पुराणा मध्ये हे लिहीले आहे की, शिवाने सांगीतले आहे मी ब्रम्हाच्या ललाटावर पगट होईल. त्या ङ्गिकाणी स्पष्ट लिहीले आहे की, शिवाने ब्रम्हाच्या तनामध्ये प्रवेश करुन पुनर्जिवित केले आहे. हे सत्य आहे की आपले सर्व कार्य ते ब्रम्हाच्या शरीरात प्रवेश करुनच करतात.

**या वेळी कशा प्रकारे साजरे करावे हे महानपर्व...**

आम्ही वर्षभर अनेक महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करतो. परंतु आपल्या परमपित्याच्या जयंती संदर्भात अनभिज्ञ आहोत. शिवरात्री शिवाची जयंती आहे. यावर्षी पुन्हा हे दिव्य पर्व आमच्या सन्मुख आहे. एकीकडे त्यांचा स्मृती दिन सुद्धा साजरे करतात. आम्ही प्रत्येक वर्षी या दिवशी उत्सव साजरा करुन सर्व काही विसरुन जातो. परंतू यावेळी हा उत्सव असा साजरा करा की आमचे जीवनच बदलून जाईल.

ते परमपिता आमच्या समोर आहेत जे मागीत ७१ वर्षापासून या सृष्टीवर अवतरीत होऊन मनुष्यात्मांना ज्ञान योगाने पावन बनवित आहेत. सर्वांना ज्ञान-अमृत पाजून अज्ञानाच्या निद्रेतून जागे करत आहेत सर्वांच्या मनातील अंधःकार मिटवत आहेत. लोक या रात्री नशेमध्ये तल्लीन होतात. उपवास पण करतात आणि शिवाच्या आगमनाची प्रतिक्षा करतात.

यावेळी आपण खऱ्या अर्थाने शिव जयंती साजरी करुया पवित्रतेचे व्रत घेऊन, ज्ञान सागराकडून ज्ञान-अमृत पीऊन, ईश्वरीय नशे मध्ये राहून आपल्या परमपित्याची भेट घेऊया. हा आपल्या परमपित्याचा जन्म दिवस आहे, यावेळी आपण असा आनंद साजरा करुया की आनंद आपल्या जीवनाचे अविनाशी अंग बनुन राहील. असे व्रत धारण करा की संपूर्ण विश्व पावन होऊन जाईल. शिवाला असा भोग नैवद्य लावा की आम्ही सर्व जण भोगने पासून मुक्त होऊन जाऊ. आता शिवाच्या आगमनाची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. तो आलेला आहे. आम्हाला जागवत आहे. अज्ञान अंधःकारापासून जागण्याची आवश्यकता आहे, अज्ञानाला ओळखून मनोविकाराच्या विळख्यातून मुक्त व्हा. ब्रम्हावत्स शिव सोबतच शिव जयंती साजरी करतील. शिव आपली निशाणी स्वःत फडकावतील. शिव स्वःत प्रसाद वाटतील, तो प्रभू प्रसाद असेल वरदानांचा. भक्त शिवाचे आव्हान करतील आणि ब्रम्हवत्स शिवला भेटतील. जे मनुष्य आत्मे नेहमीसाङ्गी अज्ञानाच्या निद्रेतून जगलेली आहेत, ज्यांनी नेहमीसाङ्गी पवित्रतेचे व्रत धारण केले आहे, जे देहभानाला त्यागून आत्मिक स्वरुपामध्ये स्थित राहीले आहेत त्यांच्यासाङ्गी शिवरात्री हिरे तूल्य आहे. आम्ही सर्व भक्तांचे आव्हान करतो की आपल्या परमपित्याला ओळखून भक्तापासून त्याची मुले बनाल तर मुक्ती व जीवनमुक्ती आपल्याला प्रभू प्रसादाच्या रुपामध्ये प्राप्त होईल.

अधिन काही जनता आणि कुठलातरी देश वा भूमि सुद्धा असेल. यावरुन स्पष्ट होते की, हा शब्द कर्तव्यवाचक किंवा सत्तावाचक आहे. अशाच प्रकारे शिव शब्द सुद्धा कर्तव्याचा बोध करवणारा आहे. जो विश्वाचे कल्याण करणारा आहे? कल्याण या शब्दापासून कोणत्या प्रतिक्रिया मिळतात. मनुष्याला ज्या अवस्थेमध्ये न रोग व्हायला पाहिजे, न दुः ख असेल, ना काळाने झडप घालून आघात होईल, न संकट असेल, न विक्षेप त्याच्या त्या अवस्थेला कल्याणकारी अवस्था म्हटले जाते.य आता यावरुन स्पष्ट होते की, जो स्वतः कल्याण स्वरुप आहे आणि कल्याण करणारा आहे. तो स्वतः आवश्य रोग, शोक व दुः ख अशांतीपासून नेहमीसाठी वेगळा असेल. आणि आनंदाचा सागर तसेच सर्व शक्तीमान असेल,तेव्हाच तर तो संपूर्ण विश्वाला सुख व शांती देत असेल आणि इतरांची संकटे व कष्टांचे हरण करणारा असू शकेल. मग तो ज्ञानस्वरुप व परिपूर्ण सुद्धा असू शकेल कारण सर्व काही जाणनाराच तर कल्याणाचे कर्तव्य करु शकतो. यावररुन स्पष्ट होते की, 'शिव' परमपिता परमात्म्याचेच दिव्य नाव आहे कारण की, परमात्माच ज्ञानाचा सागर शांतीचा सागर आनंदाचा सागर आणि सर्वशक्तीमान आहे. परंतु बघा किती आश्चर्याची गोष्ट आहे की, आज लोक म्हणतात की, परमात्म्याचे काही नाव ही नाही जो सगळ्यात जास्त नावे असणारा आहे. त्याला नावाने सुद्धा न मानणे हा कसला वेधळेपण असेल. ज्याची निशाणी (शिवलिंगाच्या रुपामध्ये स्मरण चिन्ह) आहे. त्याचे रुप तर अवश्य असणारच कारण कुठल्या वस्तुची नाव निशाणी न मानने म्हणजे त्याचे अस्तित्व न मानल्या सारखे आहे. यथार्थ दृष्टीने पाहिले तर परमात्म्याचे नाव सर्वात श्रेष्ठ आणि प्रातः स्मरणीय आहे, परंतु लोक आज त्याला विसरले आहे. शिवलिंग वास्तविक शिवाचेच स्मरण चिन्ह आहे. शिवलिंगाचा जो आकार आहे त्यावरुन हे स्पष्ट होते की, कुठल्याही देहधारीची किंवा मनुष्य वा देवी-देवतेची प्रतीमा नाही. परंतु ज्योतिस्वरुप परमात्म्याची आठवण आहे. कारण एकच परमात्मा जो असा आहे की, त्याला आपले पाच तत्वाचे शरीर नाही. इतर सर्व देवी-देवता तर स्थूल व प्रकाशमय देहधारी आहेत. बहुतेक लोक सांगतात की, परमात्म्याचे कोणतेही रुप नाही. परंतु विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, समजा परमात्म्याला कोणतेही रुप नाही तर भक्त त्याच्या दर्शनाची इच्छा का बाळगतात. लोक त्याच्या साक्षात्कारासाठी का उत्सुक आहेत. आणि त्याच्या दिव्य प्रत्यक्षतेसाठी काशी कलवर साठी का तयार होतात. व्यवहारीक क्षेत्रमध्ये वास्तविक असे होत नाही की घरामध्ये वडीलांचा फोटो लावलेला आहे. असे तर कोणी अनाथच म्हणू शकेल. कोणताही मुलगा कधीच असे म्हणणार नाही की, माझ्या वडीलांचे नाव पण नाही आणि रुप ही नाही. हा समजा लहानपणापासून जर मुलगा आपल्या वडीलांपासून वंचित असेल तर कदाचित असे सुद्धा म्हणू शकेल. परंतु आज किती आश्चर्याची गोष्ट आहे. की, मनुष्य सांगतात की, परमपित्याचे (परमात्म्याचे) काही नाव, रुप नाही. तेव्हा परमात्मा स्वतः आपले नाव सांगतात 'माझे नाव आहे शिव'

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com